**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१०४१/२०२३</u>**

<u>दत्ता बालाजी कारकिले वि.जहांगीर गिलानी बहाउद्दीन शेख</u>

**<u>नि.क्र.२९</u>**

**<u>साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ श्री.ए.एस.पठाण यांच्या मार्फत सुरुः</u>**

दि.२३/०२/२०२३ पासून उदगीर येथील कार्यालयात मी कार्यरत आहे. खरेदीपत्र सन १९८६ साली नोंदवण्यात आलेले आहे. खरेदीपत्र नोंदवल्या इंडेक्स २ चा रेकॉर्ड आम्ही नोंदवतो. मी आज इंडेक्स २ चा रेकॉर्ड आणला नाही. संबंधीत खरेदीपत्र ज्या बुकमध्ये नोंदवले ते आज मी येथे घेऊन उपस्थीत नाही. खरेदीपत्र नोंदवले म्हणजे ताबा हस्तांतरीत झाला होता हे दस्तावरून आम्ही सांगू शकत नाही. आम्ही प्रत्यक्ष मिळकतीचा ताबा दिला आहे का नाही याबद्दल कोणतीही स्वतंत्र नोंद ठेवत नाही. खरेदीपत्रामध्ये ताबा दिला असला तरी आम्ही प्रत्यक्ष जाग्यावर जाऊन त्याची पडताळनी करत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, आमचे काम फक्त दस्त नोंदवून घेणे आहे.

पुनःतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.04.10 12:12:10 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**उदगीर.**

**ठिकाणः उदगीर**

**दिनांकः– १०/०४/२०२६**